



## डॉ. संदीप बी. काळे

एम. ए., सेट, पीएच.डी. (राज्यशास्त्र)
सहाय्यक प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख
यशवंत महाविद्यालय, सेलू, जि. परभणी


[illegible]

# साहित्य आणि प्रसार माध्यमे

## (समकालीन परिप्रेक्ष्य)



संपादक

**डॉ. संदीप बी. काळे**


Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan Tal-Khed,Dist-Pune

| | | |
|---|---|---|
| 15 | महाराष्ट्रातील कृषीक्षेत्र विकासात माध्यमांचे योगदान<br>प्रा. प्रज्ञाकिरण लक्ष्मण जमदाडे | 84 |
| 16 | साहित्य: समाज आणि प्रसार माध्यमे<br>सौ प्राची प्रशांत तोडणकर | 92 |
| 17 | मराठी भाषा आणि प्रसारमाध्यमे<br>डॉ. विक्रम श्रीरंग जाधव | 100 |
| 18 | प्रसार माध्यमे: लोकशाही आणि लोकमानस<br>श्रीमती सरला शामराव कामे-कुमावत | 104 |
| 19 | मराठी साहित्याचे माध्यमांतर : एक अवलोकन<br>प्रा.राजाराम आत्माराम पाटील | 109 |
| 20 | अण्णाभाऊंची 'मैना' आणि समाज चिंतन डॉ.सोमनाथ कदम | 113 |
| 21 | प्रसारमाध्यमे व मराठी साहित्यासमोरील आव्हाने<br>प्रा. डॉ. शिवाजी रे. एंडाईत | 118 |
| 22 | साहित्यकृतीचे माध्यमांतर दुर्गा शरद भिसे | 126 |


Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan,Tal-Khed,Dist-Pune.

C.S.M.'s Arts & Com. College
CHAKAN 410501
Tal-Khed,Dist-Pune.



## साहित्य कृतींचे माध्यमांतर

**प्रा. हिरा वाघ**
भोसला मिलिटरी कॉलेज, रामभूमी नाशिक
मो.7350277715, hiravagh@gmail.com

कथा, कविता, कादंबरी, नाटक ह्या साहित्यातील मुख्यसाहित्य प्रकारामध्ये मोठ्या प्रमाणात साहित्य ठेवा साहित्य विश्वात तयार झालेला आहे.ह्या साहित्यकृतींचा आस्वाद जाणकार वाचक मोठ्या प्रमाणात घेताना आपल्याला दिसतोच आहे.परंतु ह्याच साहित्यकृतींचे जेव्हा माध्यमांतरहोते त्यावेळी तीसाहित्यकृती आणि तिचे झालेले चित्रपट नाटक इ.माध्यमातले माध्यमांतर यावर चर्चा सुरु होते व त्यात नाटक सिनेमाश्रेष्ठकी मुळकलाकृतीश्रेष्ठ अशीतुलना सुरु होते.

एखाद्या साहित्यकृतीला एखादा दिग्दर्शक सिनेमाच्या स्वरुपात दृश्य रुप देतो त्यावेळी त्याची मोठीकसोटी लागत असते.कारण त्या साहित्यकृतीतील मुळ आशय, मुळ गाभा याला धक्का न लागता त्याला त्याचे प्रदर्शन करावे लागत असते. म्हणजे ओंजळीत पाणी साठवायचे पण तेसांडू न देता योग्य ठिकाणी पोहचवायचे म्हणजे आशयाचीगळती न होऊ देता व्यवस्थित नेणे इतक्या जबाबदारीने त्या साहित्यकृतीचे दिग्दर्शन त्या दिग्दर्शकाला करावे लागते. कथा कादंबरीमधील आशय एखाद्या चित्रपटाच्या माध्यमातून माध्यमांतरीतकरतानात्याचीखूपतयारी करावी लागते. आशय विषयाच्या बाबतीत सावधगिरी बाळगत काम करावे लागते. कारण थोडे जरी दुर्लक्ष झालेतरी आशयात बदल होत जातो व त्यामुळे मुळकलाकृती भरकटत जाऊन विपरित परिणाम घडू शकतो.त्यामुळेकाळजीने ह्या सर्व गोष्टीकरणेगरजेचे असते.

चित्रपटसृष्टीमध्ये आपण बघतो की सध्याच्या काळातखूप मोठ्या प्रमाणात साहित्यकृतींचे माध्यमांतर झालेले आहे.अनेक नामवंत लेखकांच्या कथा-कादंबऱ्या, चित्रपट, मालिकांच्या माध्यमातून प्रदर्शितहोताना दिसत आहे.खरंतर यातून ज्या वाचकांना साहित्यकृती वाचण्यासाठी वेळ मिळत नाही.त्यांच्यासाठी ह्या माध्यमांतरीतसाहित्यकृती वरदानच ठरतात.या नाहीतर त्या माध्यमातूनत्यांचीती भूक भागली जाते. उज्वला बर्वे यांनी 'साहित्यकृती छोट्या पडद्यावर' ह्या आपल्या लेखात म्हटले आहेकी, 'साहित्यकृतीचे दूरचित्रवाणी कार्यक्रमात माध्यमांतर झाले पाहिजे या माध्यमातून लिखित शब्द वाचणाऱ्या मोठ्या व भौगोलिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अधिक व्यापक समाजापर्यंत अभिजात साहित्य नेता येऊ शकते' त्यांच्या या विवेचनावरुन आपल्याला हेही लक्षात येतेकी, अनेक अपरिचित व न वाचलेल्यासाहित्यकृती माध्यमांतराच्या माध्यमातून प्रदर्शित झाल्यातर रसिक त्याचा आस्वाद निश्चित घेवू शकतात. वाचता लिहिता न येणारा वर्ग तसेच वेळेअभावी वाचन न करु शकणाऱ्या वर्गासाठी अशा प्रकारचे माध्यमांतरहे वरदानच ठरणारे आहे.

# प्रसारमाध्यमे व मराठी साहित्यासमोरील आव्हाने

प्रा. डॉ. शिवाजी रे. एंडाईत
सहयोगी प्राध्यापक,चाकण शिक्षण मंडळाचे,कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण,
ता. खेड, जि. पुणे. भ्रमणध्वनी : ९७६३८९५२२०
ईमेल - shivajiendait@gmail.com

माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात हुकमत आहे; ती प्रसारमाध्यमांची. आधुनिककाळाच्या आरंभी मानवाने कल्पनाही केली नसेल, इतकी गतीशीलता आज मानवी जीवन व्यवहाराला मिळाली आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात इतक्या झपाट्याने बदल घडतील, असा मानवाने विचार देखील केला नसेल, इतके परिवर्तन वा बदल घडल्याचे आपण अनुभवत आहोत. 'ग्लोबल व्हिलेज' या संकल्पनेने अवघे विश्व व्यापल्याची प्रतीती येते आहे. तसेच, 'अर्थ वा पैसा' या सत्तेने प्रत्येक मानवी समुहमनाचा ताबा घेतलेला दिसतो आहे. निवांत, निरोद्योगी जगणे; या सहस्त्रकात आता कोणलाही शक्य नाही. विज्ञान-तंत्रज्ञानाने व त्याच्या गती-प्रगतीने मानवी मनाचा ताबा घेतला आहे, असे नक्की म्हणता येईल. 'ग्लोबल व्हिलेज' या संकल्पनेनं मानवाला एकटं राहणं, एकटेपणा अनुभवणं अशक्य झाले आहे. अंतर्मुख होणं, स्वतःला भवतालच्या घडामोडींपासून दूर ठेवणं, ही बाब अशक्यच झाली आहे. कितीतरी नवनवीन वा अनावश्यक गोष्टींचा विळखा मानवाला करकचून आवळतो आहे. आवश्यक वा अनावश्यक वस्तू कोणती ? ही विचार करण्याची क्षमता व संधीच माणसाने हरवली आहे. कुठल्याही नवनिर्मितीचा आनंद देखील किती वेळ टिकतो ? हा ही मोठा प्रश्नच आहे.

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या सहस्त्रकात मानवी गरजा समोर ठेऊन तसेच, नवीन गरजा निर्माण करून विविध प्रकारची साधने, वस्तू, खेळणी, यंत्रे, सेवा सामग्री इ.चीं निर्मिती होते आहे व ती होत राहणार आहे. वस्तूंचा उपभोग, उपयोग आज प्रत्येकाला आवश्यक वाटतो आहे. बाजारपेठेच्या माध्यमातून साधनांचे आक्रमण मानवी दैनंदिन जगण्यावर, त्याच्या भाव-भावनांवर घडते आहे. जाहिरात व



C.S.M.'s Arts & Com. College CHAKAN 410501 Tal-Khed, Dist-Pune.
Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan,Tal-Khed,Dist-Pune.



सादरीकरणाच्या या युगात माणूस देखील एक वस्तू झाला आहे. यांत्रिकीकरणाने त्याचा निवांतपणा हरवलायं. त्याला स्वतःला काय योग्य अन् काय अयोग्य, काय हवे आणि काय नको ? हे ठरवायला देखील उसंत नाही. इतक्या प्रचंड प्रभाव, दबावाने मानवी जीवनाला व्यापून टाकले आहे.

वाड्.मयनिर्मिती ही एक स्वतंत्र कला आहे, ती एक स्वतंत्र अनुभूती आहे. वाड्.मय निर्मितीला अन् त्यातही चांगल्या निर्मिती करण्यासाठी लेखकाला एकांतवासाची, शांततेची आवश्यकता असते. सद्याच्या परिस्थितीत मानवाचा हा एकटेपणा पूरता हरवलाय. प्रसारमाध्यमांनी व समाजमाध्यमांनी तो एकटेपणा व्यापून टाकलाय. वर्तमानपत्रे, दूरदर्शन व विविध वाहिन्या, एफ. एम. रेडिओ, जाहिराती, इंटरनेट, मोबाईल/भ्रमणभाष इ. कितीतरी माध्यमांचा विळखा मानवाच्या सभोवती आहे. माणसाला एकटेपणा मिळवू द्यायचाच नाही, हा विडा जणू या माध्यामांनी उचलला आहे. क्रिकेटसारख्या खेळाच्या अतिरेकाने तर भारतातील इतर खेळांचे अस्तित्वच संपवले आहे. आता काही थोडे फार प्रयत्न इतर खेळांसाठी काही सेलेब्रिटींनी सुरू केले आहे, ही सुखद बाब म्हणावी लागेल. क्रिकेटच्या जोडीला राजकारण व राजकीय निवडणूका हा तर नित्याचा विषय म्हणावा लागेल. भारतीय माणूस सतत राजकारणावर बोलू शकतो, चर्चा करू शकतो, त्याचे महत्त्व असो वा नसो. या कोलाहलात दर्जेदार व अभिजात साहित्यनिर्मिती व्हावी, ही अपेक्षा करणे, धाडसाचे म्हणावे लागेल. असे असूनही या सहस्त्रकात साहित्यव्यवहार थांबलेला नाही. तो प्रचंड गतिशील झाला आहे, हे मात्र निश्चित दर्शविता येते. एका अर्थाने ही प्रसारमाध्यमे मानवी जीवनाला लाभलेले एक वरदान आहे; असे म्हटल्यास वावगे ठरू नये. या काळात निर्माण झालेल्या साहित्याची गुणात्मकता व परिणामकारकतेचा शोध घेणे महत्त्वाचे वाटते.

हे माहितीचे युग आहे. प्रसारमाध्यमांद्वारे माहितीचा प्रचंड स्रोत जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचा रतीब अहोरात्र व अविरत सुरू आहे. एकविसावे शतक हे ग्राहकाधिष्टीत-बाजारपेठेचे असल्याने बाजारव्यवस्थेचे सर्व नियम व परिमाणे प्रसारमाध्यामांनी अंगिकारलेले दिसतात. ही व्यवस्था ग्राहक केंद्रिभूत